## शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## आणि महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने,

## डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व शिक्षक दिनानिमित्त आयोजित,

## दिव्यांग शाळेतील शिक्षकांचा सन्मान व विशेष सन्मानार्थी गौरव सोहळा

**संपूर्ण अहवाल**

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल व महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्था यांच्या संयुक्त सहयोगातून, दिनांक ५ सप्टेंबर २०२४ रोजी स्वतंत्र भारताचे द्वितीय राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिनाचे आयोजन अत्यंत आगळ्या वेगळ्या पद्धतीने करण्यात आले. या दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात रायगड जिल्ह्यातील व आजूबाजूच्या प्रदेशात असलेल्या दिव्यांग शाळेतील शिक्षकांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद महाविद्यालयाच्या मा. प्राचार्या डॉ. रमा भोसले यांनी भूषविले, तर आयोजक म्हणून ज्येष्ठ प्राध्यापिका बिजली दडपे व श्री. एन. डी. खान यांनी कार्यभार सांभाळला.

दीपप्रज्वलन, सरस्वतीपूजन आणि डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेच्या पूजनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. महाविद्यालयाच्या प्राचार्या आणि प्राध्यापकांच्या हस्ते प्रमुख पाहुणे व विशेष सन्मानार्थ्यींचे स्वागत करण्यात आले. तसेच स्वागतगीताच्या माध्यमातून कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या सर्वांचे स्वागत करण्यात आले. ज्येष्ठ प्राध्यापिका बिजली दडपे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत कार्यक्रमाचे प्रयोजन थोडक्यात सर्वांसमोर सादर केले.

वाङ्मय मंडळाद्वारे; सर्व छात्राध्यापकांनी लिहिलेल्या 'माझे आदर्श शिक्षक' या विषयावरील निबंधांचे संकलन करून तयार करण्यात आलेल्या 'गुरूवंदना' या मुखपत्रिकेचे उद्घाटन श्रीमती सुनिता जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर इंटिल्लॅक्च्युअल डिसेबल स्पेशल स्कूल, नवीन पनवेल या दिव्यांग शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थ्यांनी नृत्य सादर करत उपस्थितांची मने जिंकली.

सामाजिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रात सातत्याने आपले योगदान देत राहिल्याबद्दल श्री. एन. डी. खान व औद्योगिक आणि शैक्षणिक क्षेत्रात महत्वपूर्ण कामगिरी करतांना पूर्वराष्ट्रपती मा. श्री. रामनाथ कोविंद यांच्या हस्ते ज्यांच्या पुस्तकाचे प्रकाशन झाले, असे श्री. सपनकुमार बर्धन; या दोघांचेही महाविद्यालयाच्या वतीने विशेष सन्मानार्थी म्हणून मानपत्र देऊन जाहीर सत्कार करण्यात. आला. यावेळी श्री. एन. डी. खान सर यांनी आपले आभारपर मनोगत व्यक्त केले, तर श्री. सपनकुमार बर्धन यांनी आपल्या वाणीतून सर्वांना पुनर्प्रफुल्लित केले. दोन्हीही विशेष सन्मानार्थींच्या मानपत्रांचे वाचन प्रा. बिजली दडपे यांनी केले, तर या मानपत्रांचे लेखन बी. एड. द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थी अविनाश काठवटे यांनी केले.

विविध दिव्यांग शाळेतून आलेल्या शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते गुलाबपुष्प व सन्मानपत्र देऊन यथोचित गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या श्रीमती पाकीजा अत्तार यांनी आपल्या मनोगतातून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनावर प्रकाश टाकला, तर श्रीमती सुनिता जोशी यांनी कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्वांनाच शिक्षक दिनानिमित्त शुभेच्छा संदेश दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा मा. प्राचार्या डॉ. रमा भोसले यांनी अध्यक्षीय भाषणातून 'आजच्या शिक्षकाची भूमिका कशी असावी' यावर सर्वांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री. अविनाश काठवटे यांनी केले, तर श्रीमती सविता मुळीक यांनी आभार प्रदर्शन केले.

'वंदे मातरम्'ने या कार्यक्रमाची शुभसांगता झाली.

Edit with WPS Office



















Edit with WPS Office












Edit with WPS Office